Exh.01

# अहमदनगर येथील मे. चिफ ज्युडिशिएल मॅजिस्ट्रेट साहेब, अ.नगर यांचे कोर्टात......

एस. सी. सी. केस नं. 2195 /२०२५

**फिर्यादी**

श्री संत नागेबाबा मल्टीस्टेट को ऑप. अर्बन क्रेडीट सोसायटी लि., अहमदनगर, तर्फे व करीता माहितगार इसम श्री. सुनिल पोपट पेहेरे,
मो. नं. ९५५२५५४०३४
वय – ४४ वर्षे, धंदा – नोकरी
रा. सावेडी, अहमदनगर.

**आरोपी**

लता अशोक आव्हाड (मो. नं. ९९२१५३६२८९)
वय – ३६ वर्षे, धंदा – व्यवसाय
रा. कोल्हेश्वरी बिल्डींग, गुरुकुल नगर,
गुरुकुल शाळेजवळ, तपोवन रोड, सावेडी,
अहिल्यानगर – ४१४००३

**फिर्याद – निगोशिएबल इन्स्ट्रुमेंट ॲक्टचे कलम १३८ अन्वये**

**परिशिष्ट**

| | | |
|---|---|---|
| १ | चेक देणाऱ्याचे नाव | लता अशोक आव्हाड |
| २ | चेकची रक्कम | रु. ९०,०००/– |
| ३ | चेक नंबर व दिनांक | ००००३५, दिनांक २१.१२.२०२४ |
| ४ | बँकेचे नाव | दि रुक्मिणी सहकारी बँक लि., शाखा पाईपलाईन रोड, अहिल्यानगर |
| ५ | चेक परत आल्याचा दि.व कारण | २४.१२.२०२४, फंडस् इनसफिशिएंट |
| ६ | नोटीस पाठविल्याचा दिनांक | ०८.०१.२०२५ |
| ७ | नोटीस मिळाल्याचा दिनांक | दि. १६.०१.२०२५ अनक्लेम्ड |

| | | |
|---|---|---|
| ८ | गुन्हा घडल्याचे कारण व दिनांक | चेक न वटता परत आल्याने, |
| ९ | पो.स्टे. हद्दीत आहे ते ठिकाण | तोफखाना पोलीस स्टेशन |

**<u>या कामी फिर्यादी विनम्रपणे कळवितो ते येणे प्रमाणे –</u>**

१) श्री संत नागेबाबा मल्टीस्टेट को ऑप. अर्बन क्रेडीट सोसायटी लि., अहमदनगर, ही मल्टीस्टेट को ऑपरेटीव्ह सोसायटीज कायद्याप्रमाणे रजिस्टर झालेली असून तिचे मुख्य कार्यालय अहमदनगर येथे असून इतरत्र अनेक शाखा आहेत. सदरील संस्थेमार्फत सभासदांना धंद्यासाठी, व्यवसाय वाढीसाठी, घर बांधणीसाठी, घर दुरुस्तीसाठी, दुग्ध व्यवसायासाठी, वाहन खरेदीसाठी, घरगुती कारणासाठी, वैयक्तीक कारणासाठी व इतरही व्यवसायासाठी अल्प मुदतीचे तसेच दिर्घ मुदतीसाठी कर्ज पुरवठा केला जातो.

२) श्री. सुनिल पोपट पेहेरे हे सदरील संस्थेमध्ये नोकरीस असुन सभासदांनी दाखल केलेल्या कर्ज मागणी अर्जाची छाननी करणे, कागदपत्रांची पुर्तता करुन घेणे, कर्जदार व जामीनदार यांचे दस्त करुन घेणे, कर्ज प्रकरणे बोर्डासमोर ठेवणे, मंजुर कर्ज अर्जांच्या कर्जाचे वाटप करणे, त्या कर्जाच्या हप्त्यापोटी, वसुलीपोटी रोख रकमेची वसुली करणे अथवा सभासदांनी/जामीनदारांनी हप्त्यापोटी चेक दिल्यास सदरील चेक फिर्यादी संस्थेसाठी स्विकारुन ते संस्थेच्या खात्यात भरुन चेक कॅश करुन ती रक्कम सभासदांच्या कर्ज खात्यावर जमा करणे, इ. व्यवहार श्री. पेहरे करतात. तसेच ज्या सभासदांनी कर्ज रकमेची परतफेड केली नाही, त्यांचे विरुद्ध वसुलीसाठी दिवाणी व फौजदारी स्वरुपाची कार्यवाही करण्याबाबत फिर्यादी संस्थेने त्यांना ठराव करुन अधिकार दिले आहेत.

३) आरोपीने फिर्यादी संस्थेच्या पाईपलाईन रोड, अहिल्यानगर शाखेकडे टेलरिंग व्यवसाय वाढीसाठी कर्जाची मागणी केली होती. आरोपीने केलेल्या कर्ज मागणी अर्जासोबत आरोपीने आवश्यक ते कागदपत्र सादर केली. आरोपीच्या कर्ज अर्जाचा विचार करुन फिर्यादी संस्थेचे मुख्य कार्यालय, अहमदनगर यांनी आरोपीस वर नमुद कारणास्तव रक्कम रु. ४०,०००/– (रुपये चाळीस हजार मात्र) चे कर्ज मंजुर करुन सदरचे कर्ज आरोपीस तारीख २६.१२.२०१९ रोजी अदा केले. सदरील कर्ज

मंजुरी नंतर फिर्यादी संस्थेस आरोपीने योग्य ते कायदेशीर दस्त करुन दिले. तसेच सदरील कर्जाची परतफेड नियमानुसार करेल असे आरोपीने फिर्यादी संस्थेस कबूल केलेले होते व आहे. परंतु आरोपीने सदरचे कर्ज वेळेवर व नियमित फेडले नसल्यामुळे आरोपीकडे सदर कर्जाची बाकी थकीत राहीली.

४) फिर्यादी संस्थेने आरोपीकडे सदर थकीत कर्ज रकमेची मागणी केली असता आरोपीने सदर थकीत कर्ज रकमेपोटी फिर्यादी संस्थेस तारीख २१.१२.२०२४ या तारखेचा रक्कम रु. ९०,०००/- या रकमेचा तिचे खाते असलेल्या दि रुक्मिणी सहकारी बँक लि., शाखा पाईपलाईन रोड, अहिल्यानगर या बँकेचा ००००३५ या अनुक्रमांकाचा अकौंट पेयी चेक अदा केला. सदरील चेक श्री. पेहेरे यांनी फिर्यादी संस्थेसाठी स्विकारला व सदरील चेक देतेवेळी आरोपीने फिर्यादी संस्थेस विश्वास व भरोसा दिला की, सदरील चेक बँकेत भरल्यानंतर सदरील चेक वटला जाऊन त्याची रक्कम फिर्यादी संस्थेस मिळेल. आरोपीच्या शब्दांवर विश्वास ठेवुन श्री. पेहेरे यांनी फिर्यादी संस्थेसाठी सदरील चेक स्विकारला.

५) श्री. पेहेरे यांनी फिर्यादी संस्थेकरिता सदरील चेक स्विकारल्याने त्यांनी तो चेक फिर्यादी संस्थेचे खाते असलेल्या शरद सहकारी बँक लि., शाखा सावेडी, मनमाड रोड, अहमदनगर येथे भरला. सदरील चेक क्लेअरींगकरीता आरोपीच्या बँकेकडे पाठविला गेला असता आरोपीने जाणुनबुजून तिच्या बँक खात्यात सदरचा चेक वटला जाईल इतपत पुरेशी रक्कम शिल्लक न ठेवल्यामुळे सदरील चेक फंडस् इनसफिशिएंट असा शेरा मारुन दि. २४.१२.२०२४ रोजी न वटता परत आला. वास्तविक पाहता सदरील चेक वटला जाण्याची व्यवस्था करणे ही आरोपीची कायदेशीर जबाबदारी होती परंतु तसे झालेले नाही. सदरील चेकची रक्कम फिर्यादी संस्थेचे बँक खात्यात जमा झालेली नाही.

६) सदरचा चेक वटला गेला नाही म्हणून फिर्यादीने आरोपीस दिनांक ०८.०१.२०२५ रोजी रजिस्टर पोस्टाने वकिलांमार्फत नोटीस पाठवुन सदर चेकच्या रकमेची मागणी केली. परंतु सदर नोटीस आरोपीने जाणुनबुजुन न स्विकारल्याने सदर नोटीसीचे अस्सल पाकीट पोष्टाचे

पोहोच पावतीसह दिनांक १६.०१.२०२५ रोजीचे अनक्लेम्ड अशा शेऱ्यासह परत आले. अशा प्रकारे आरोपीस कायद्याप्रमाणे नोटीस मिळुन देखील आरोपीने मुदतीत सदर चेकची रक्कम फिर्यादी संस्थेस आणुन दिली नाही अथवा आरोपी सदर नोटीसीप्रमाणे वागली नाही. त्यामुळे **आरोपीने निगोशिएबल इन्स्ट्रुमेंट ॲक्टचे कलम १३८ नुसार** गंभीर स्वरुपाचा गुन्हा केलेला आहे. तरी सदर गुन्ह्याची चौकशी होवुन आरोपीस जास्तीत जास्त कडक शासन होऊन जास्तीत जास्त दंड ठोठावण्यात यावा व आरोपीकडून चेकची रक्कम नुकसान भरपाई म्हणून फिर्यादीस अदा करण्याचा हुकूम व्हावा.

सबब फिर्यादीची फिर्याद असे. यास साक्षीपुरावा खालील प्रमाणे –

१) मा. शाखाधिकारी साहेब,
दि रुक्मिणी सहकारी बँक लि., शाखा पाईपलाईन रोड, अहिल्यानगर

२) मा. शाखाधिकारी साहेब,
शरद सहकारी बँक लि., शाखा सावेडी, मनमाड रोड, अहमदनगर

येणे प्रमाणे साक्षीपुरावा असे.

जादा पुरावा लागल्यास देण्याची परवानगी असावी.

येणेप्रमाणे फिर्यादीची फिर्याद असे.

अहमदनगर

दिनांक –२१.०२.२०२५

फिर्यादी

Shri Sant Nagebaba Multi State Co-Op
Urban Credit Society Ltd. A'Nagar

**S.C.C.No.2195/2025**
**Shri Sant Nagebaba Multistate Co.Operative Urban Credit Society Ltd., Ahmednagar**
**Vs**
**Lata Ashok Avhad**

## ORDER BELOW EXH.1

Read the complaint. Heard the learned counsel for the complainant. By virtue of Section 4(2) of The Bharatiya Nagarik Suraksha Sanhita, 2023, being special Act, the procedure prescribed under Section 142 of The Negotiable Instruments Act, 1881 i.e. taking cognizance of such offence on affidavit is applicable and not the proviso of Section 223(1) of The B.N.S.S., 2023 i.e. opportunity of hearing to the accused be given before taking the cognizance of offence. The complainant has submitted the affidavit. Perused the affidavit and documents on record. From the record, prima facie sufficient grounds appears for proceeding against the accused for the offence punishable under Section 138 of The Negotiable Instruments Act, 1881. Resultantly, the following order :

## O R D E R

1. Issue process against the accused under Section 227 of The Bharatiya Nagarik Suraksha Sanhita, 2023 for the offence punishable under Section 138 of The Negotiable Instruments Act, 1881.

2. Issue summons to the accused in regular mode as well as by R.P.A.D.

3. Hamdast be given to the complainant for service of summons, if required.

MAYA ABHIJEET DESHMUKH
Digitally signed by MAYA ABHIJEET DESHMUKH
DN: cn=MAYA ABHIJEET DESHMUKH, ou=BOMBAY HIGH COURT,CID - 6953363, o=BOMBAY HIGH COURT, st=Maharashtra, c=IN

( Maya A. Deshmukh )
Addl. Chief Judicial Magistrate,
(Court No.06) Ahmednagar

Date : 17.03.2025